FROM : DR PATANGRAO KADAM | FAX NO. : 0091 20 5654875 | Mar. 27 1999 07:30AM P1

12-06-01 17:36

KIND. ATTEN. BALASAHEB

महाराष्ट्र शासन

क्रमांक : [illegible] २०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ जून, २००१.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे

**विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षा परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे सदेय स्थानिक गरज लक्षात घेऊन खालील शैक्षणिक संस्थेला त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण |
|---|---|---|
| १. | भारती विद्यापीठ, पुणे | बालेवाडी, पुणे |
| २. | भारती विद्यापीठ, पुणे | विटा, जि. सांगली |

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : खाँइलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, संदर्भ शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर [illegible] शासनास तातडीने पाठवावा.

(वि.ब.चिंदरकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. रायगड.
३) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
४) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
६) निवड नस्ती, प्राशि-३.

४४१२-१३

जा.क. प्राश-2/प्राशा/कोवि/2002

शिक्षण उपसंचालक कार्यालय,

कोल्हापूर दिनांक :- 10 FEB 2004

००३
१९/२/०४

PUNE.

प्रति

अध्यक्ष/सचिव,

भारती विद्यापीठ,

भारती विद्यापीठ भवन,

लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे - ४११०३०

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात जून २००१ पासून खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागा कडील क्र.- कीएलएस- १०००/(५०५/२०००)/(१)/ प्राशि-३ दि. ९/१/२००१

शासनाचे संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या प्राथमिक शाळेस ~~विना अनुदान~~/कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर जून - २००१ - पासून कृतकीकरणाने इ. 1 ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस - इंग्रजी - माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे ठिकाणी व तालुका | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | विटा ता खानापूर जि. सांगली | इंग्रजी | इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) जून २००१ पासून कृतकीकरणाने परवानगी |
| | | | |

1. संस्था सदर शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यांत आर्थिकदृष्ट्या सक्षम असली पाहिजे.

2. संस्थेने शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली 1949 मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित आणि प्रशिक्षीत शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

3. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे वर्गातील विद्यार्थी संख्या, विद्यार्थी प्रवेश, इ. काटकोरपणे पालन केले पाहिजे.

4. संस्थेने जवळपासच्या शाळेवर [illegible] शाळेवर विपरीत परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

5. प्राथमिक शाळेचे वर्ग इ. 1 ली ते 4 थी पर्यंत ठेवण्यांत यावेत व पूर्वपरवानगी शिवाय पुढील वर्ग उघण्यांत येवू नयेत.

मागे पहा.

6. शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस –1099/556/99 प्राशि–3 दि. 12.1.2002 मध्ये दिलेल्या सूचनानुसार शाळेमध्ये स्वतंत्र सुव्यवस्थित स्वच्छतागृहाची व पाण्याची सोय उपलब्ध करुन घ्यावी. सदर अटींची पूर्तता न केल्यास आपले शाळेस प्रथम मान्यता दिली जाणार नाही.

7.

स्वाक्ष प्रतिवर मा. शिक्षण
उप संचालक यांची स्वाक्षरी आहे

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग,कोल्हापूरकरीता

प्रत :–

शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद, – – – – – – – –

प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ तास जि सांगली

2/– त्यांना कळविण्यात येते की, संस्था विहीत अटींची पूर्तता करीत असल्यास तीन महिन्याचे आत प्रथम मान्यता देण्याविषयीची कार्यवाही पूर्ण करावी व तसे या कार्यालयास कळवावे, तसेच संस्थेने 1 ते 7 मुद्यांपैकी यापैकी कोणतीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार करावा तसेच शासन परिपत्रक क्र. व्हिएलएस–1099/556/99/प्राशि–3, दि. 12.9.2000 मध्ये दिलेल्या सुचनांनुसार सदर शाळेने स्वतंत्र स्वच्छतागृहाची व पाण्याची सोय उपलब्ध केल्याशिवाय प्रथम मान्यता देवू नये.

कायम विना अनुदान
वर्ग / तुकडी

क्र.प्राथ/आस्था 10/ खाप्राशा/
वशी/ 939 /2092
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद, सांगली.
दिनांक 1/६/2092

प्रति,
.मुख्याध्यापक / ~~मुख्याध्यापिका~~,
भारती विद्यापीठ इंग्लिश मेडीयम स्कूल, विटा

विषय - खाजगी मान्यताप्राप्त शाळांना सन 2091-2092 या वर्षी तुकडी मंजुरीबाबत...
संदर्भ - 1. शासन निर्णय क्र. व्हीएलएस 1002/(1000/02) प्राशि - 3. दि. 14.1.2003.
2. शासन निर्णय क्र. व्हीएलएस 1002/(1000/02) प्राशि - 3 . दि. 23.9.2003.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आपल्या शाळेच्या खालील तुकडया / वर्ग मंजुरीचा प्रस्ताव क्षेत्रिय अधिका-यामार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावातील माहिती व क्षेत्रिय अधिका-याची व या कार्यालयाची शिफारस विचारात घेऊन संदर्भीय शासन निर्णयास अधिन राहून तसेच खालील 1 ते ०९ विशेष अटींना अधिन राहून खालील तुकडया / वर्ग कायम विना अनुदान तत्वावर मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | वर्ग | माध्यम | मंजूरीचे तत्व | मंजूर केलेल्या वर्गाचा/~~तुकडीचा~~ क्रमांक | एकुण मंजूर वर्ग ~~तुकड्यांची~~ संख्या | केल्यापासून मंजूर केले ते शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | इ०६वी | इंग्रजी | कायम विना अनुदान | प्रथम वर्ग | एक | जून २००६ |
| २) | इ. ५वी | इंग्रजी | कायम विना अनुदान | प्रथम वर्ग | एक | जून 2006 |

1) मंजूर केलेली तुकडी / वर्ग कायम विना अनुदान तत्वावर मान्य केलेली आहे. सबब सदर तुकडी / वर्गांकरीता भविष्यामध्ये कधीही अनुदानाची मागणी करता येणार नाही.
2) सदर तुकडी / वर्गाचा माध्यम भविष्यात बदलता येणार नाही.
3) शासन निर्णय दिनांक 2.12.96 मधील अटी व शर्ती तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश आपणावर बंधनकारक आहे.
4) मंजूर केलेल्या तुकडीच्या विषयाची विदयार्थी संख्येबावत शासनाने विहीत केलेल्या निकषामध्ये कोणतीही सूट मिळणार नाही. सदर वर्ग / तुकडी मध्ये विदयार्थी कमी आढळल्यास सदर मंजूरी रद्द करण्यात येईल. तसेच विहीत मर्यादेपेक्षा जादा प्रवेश देऊ नयेत.
5) मंजूर केलेल्या वर्ग / तुकडी करीता आवश्यक असणारी भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शाळा व संस्थेवर राहील.
6) मंजूर केलेल्या वर्ग / तुकडीमुळे नजीकच्या शाळावर अनिष्ट परिणाम झाल्यास सदर मंजूरी रद्द करण्यात येईल.
7) मंजूरी केलेल्या वर्ग / तुकडीमुळे निर्माण होणा-या शिक्षक पदावर विहीत शैक्षणिक अर्हतेचे विहीत वयोमर्यादेचे मागास वर्ग अनुशेषानुसार पात्र उमेदवार नियुक्त करुन मान्यता प्रस्ताव कार्यालयास सादर करावा.
8) या कार्यालयाच्या पूर्व परवाणगी शिवाय इयत्ता 5 वी चा नवीन वर्ग सुरु करु नये.
~~9) मंजुर केलेल्या वर्ग / तुकडीतील विद्यार्थ्यांकडून नियमानुसार शैक्षणिक फी ची आकारणी करावी.~~

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जि. प. सांगली.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
1. प्रशासन अधिकारी, नगरपरिषद प्राथ. शिक्षण मंडळ, सांगली/मिरज/तासगांव/विटा

प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक - ०२३३-२३७२७१७ ई मेल - eoprisang@gmail.com

वाचले-१.गट शिक्षणाधिकारी खानापूर पंचायत समिती विटा कडील जा.क्र.खापंस/शिवि/प्र.मा.आस्था-१/९१२/२०२२ दिनांक-०९/०१/२०२२
२.शालेय शिक्षण व विभागा कडील क्र व्हीएलएस १०००/५०९/२०००)/(१)/प्राशि-३ दिनांक-१२ जून २००१
३.मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे कडील जा.क्र.प्राथ-२/प्रशा-२/प्राशा/कोवि/४४१२-१३/०२ दिनांक-१०/०२/२००४
४.या कार्यालयाकडील मंजूर टिप्पणी दिनांक- / /२०२२

****************************************

जा.क्रं.जिपसां/प्राशिवि/आस्था-१०/ 1182 /२०२२ दिनांक- 25 / 01 /२०२३

**प्रथम मान्यता आदेश :-**

उपरोक्त वाचा क्रमांक १ ते ४ अन्वये भारती विद्यापीठ पुणे या संस्थेने सन २०००-२००१ पासून भारती विद्यापीठ इंग्लिश मिडीयम स्कूल विटा ता.खानापूर जि. सांगली इंग्रजी माध्यम या नावाने इ.१ ली ते इ.७ वी करिता शाळा सन २०००-२००१ पासून सुरु केलेली आहे.सदर शाळेस खालील अटी व शर्तीस अधिन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.शासनाने ज्या ठिकाणी शाळेस परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजणेत येईल.

३.शासन परवानगी आदेशामध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे,त्या वर्गाव्यतिरीक्त इतर वर्ग सरु करता येणार नाहीत.

४.परवानगी मिळाल्यापासून १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु केलेली नाही,असे निदर्शनास आल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

५.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

६.नविन/दर्जावाढ शाळेमध्ये शासन निर्णय दिनांक-२९/६/२०१३ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील या शाळेच्या संदर्भात आर.टी.ई ॲक्ट २००९ मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

७.शाळेमध्ये आकारणेत येणारे शैक्षणिक शुल्क शासनाचे प्रचलित नियम तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारीत शासन नियमानूसार आकारणेत यावे.तथापी सदरचे शैक्षणिक शुल्क अवाजवी असू नये.नियमबाह्य शुल्क आकारणी केलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

८.शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

९. अधिनियमातील तरतुदीनुसार संस्था वरील वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यास कायमपणे सक्षम असली पाहिजे.या वर्गाना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुरी दिली असलेने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देणेत येणार नाही.

१०.शासन निर्णय दिनांक-३/११/२००९ नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डिंग कोडनुसार असणे आवश्यक आहे.

११.सदरची प्रथम मान्यता आपण सादर केलेल्या कागपत्रांच्या आधारे देण्यात येत असुन,भविष्यात सदर कागदपत्रे खोटी अथवा चुकीचे आढळल्यास आपली प्रथम मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२.शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्ती नियमाच्या अधिन राहुन नेमला पाहीजे तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मान्यता घेतली पाहीजे.तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजे.

१३.मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांचे परवानगी आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता होण्याच्या अधिन राहून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

(मोहन गायकवाड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सांगली

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**

१. अध्यक्ष / सचिव, भारती विद्यापीठ पुणे
२.मुख्याध्यापक, भारती विद्यापीठ इंग्लिश मिडीयम स्कूल विटा ता.खानापूर

# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

महाराष्ट्र शासन

शिक्षण उपसंचालक कार्यालय, ... 2502 ... 24 JUL 2000

क्रमांकः नमाशा १०००/(३३०/२०००)/माशि १.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः-१८ जुलै,२०००.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर

**विषय- नवीन माध्यमिक शाळेस परवानगी मिळणेबाबत.**
**(इंग्रजी माध्यम) सन २०००-२००१.**

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या सहपत्रातील सहा शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी इंग्रजी माध्यमातून जून,२००० पासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे:-

अ) सदर माध्यमिक शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ब) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

क) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही, वा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीने लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेस नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी:-

१) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

२) संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्र.नमाशा १०००/(३३०/२०००)/माशि-१,
दिनांक १८ जुलै, २००० चे सहपत्र.

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेल्या संस्थाची यादी

| अ. क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| | **बृहन्मुंबई विभाग** | | | |
| १ | रिझवी एज्युकेशन सोसायटी, वांद्रे, मुंबई | मढ, मालाड (पश्चिम) | इंग्रजी | ८वी |
| | **नाशिक विभाग** | | | |
| २ | लॉर्डस एज्युकेशन ट्रस्ट, विरार, जि.ठाणे | विरार (पश्चिम), जि.ठाणे | इंग्रजी | ८वी |
| ३ | श्रीमती कांतीलालन तिवारी एज्युकेशन सोसायटी, भाईंदर (पूर्व), जि.ठाणे | भाईंदर (पूर्व), जि.ठाणे | इंग्रजी | ८वी |
| | **पुणे विभाग** | | | |
| ४ | श्री.रामराज्य शिक्षण संस्था, बिबवेवाडी, पुणे | धनकवडी, पुणे | इंग्रजी | ८वी |
| ५ | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड, जि.पुणे | सासवड, पुरंधर, जि. पुणे | इंग्रजी | ८वी |
| | **कोल्हापूर विभाग** | | | |
| ६ | भारती विद्यापीठ, पुणे | विटा, सांगली | इंग्रजी | ८वी |

**एकूण ६ (सहा इंग्रजी माध्यमिक शाळा)**

**कायम विना अनुदान**

जा.क्र. शिउसं/कोवि/माध्य २/नमाशा/०९ ३९८८-८३
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
दिनांक : / /२०० 31 JAN 2009

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव,
भारती विद्यापीठ,
पुणे.

विषय : सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात जून, २००८ पासून नवीन माध्यमिक शाळांना **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देणेबाबत.

संदर्भ : १. शासन पत्र क्र. नमाशा-१०००/(३३०/२०००) माशि-१ दि.१८.०७.२०००
२. शासन निर्णय क्र. माशानु/२००७/(१००१/०७) माशि-१ दि.१९ ऑक्टो.,२००७

शासनाचे संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेत खालील तपशिलानुसार वर्ष २००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदानित तत्वावर** नविन माध्यमिक शाळा सुरू करण्यास माध्यमिक शाळा संहितेमधील नियमास अधिन राहून तसेच खालील अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे ठिकाण व तालुका | माध्यम | इयत्ता | केव्हापासून |
|---|---|---|---|---|
| १. | विटा<br>ता. खानापूर | इंग्रजी | आठवी | जून २००८ पासून.<br>नुतनीकरणाने. |

**कायम विना अनुदानित तत्वावर**

अ) या नवीन माध्यमिक शाळेला **कायम विना अनुदानित तत्वावर** मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र राज्य खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क) शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

ड) संस्था **कायम विना अनुदानित तत्वावर** माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे संस्था अध्यक्षांचे शपथपत्र संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेमार्फत सादर करावे.

इ) संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे. उपरोक्त शर्तीची पूर्तता न झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्याचा विचार केला जाईल.

फ) **"कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा "** असा फ़लक ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संस्थेवर बंधनकारक आहे.

त) संस्थेने संबंधीत अधिकाऱ्याशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना कायम विना अनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

थ) आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यता मिळणेसाठी शाळा संहिता नियम ३,१ अनुसार शाळा सुरू झालेपासून एक महिन्याच्या आत विहीत प्रपत्रात संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे अर्ज करावा.

तसेच विभागीय मंडळाच्या मान्यतेकरिता राज्य माध्मिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियमन मधील नियम क्र. २८ अन्वये विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे मुदतीत अर्ज करावा.

द) ज्या संस्थांना परवानगी आदेश मिळाल्यानंतर तात्काळ शाळा सुरू करणे शक्य होणार नाही, अशा संस्थांनी पुढील वर्षी शाळा परवानगीने नुतनीकरण करण्यासाठी त्वरीत अर्ज करून शासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ध) माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची शाळा / संस्था पूर्तता करते किंवा कसे याचा सविस्तर अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेमार्फ़त त्वरीत पाठवावा.

स्वाक्षरित मा. शिक्षण
उप संचालक यांची स्वाक्षरी असे

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर करिता

प्रत : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली.
यांना त्यांच्या प्रस्ताव क्रं. माध्य/शिक्षण/वशि/नमाशा/६४३६/ दि.११.०९.२००८
अन्वये माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

२/- सदर माध्यमिक शाळा सुरू असल्याची खात्री करून घेवून वर्ग तुकडी, पटसंख्या आणि भौतिक सुविधेची माहितीसह अहवाल सादर करावा.

सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने वर्ग-२ पेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या अधिकाऱ्यामार्फ़त शाळेची तपासणी करून आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल व संस्थेची विहीत नमुन्यातील मान्यतेबाबता अर्ज सदर पत्राच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रत : मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना त्यांचे संदर्भिय पत्रान्वये माहितीस्तव सविनय सादर.

प्रत : मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

प्रत : गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, खानापूर, जि.सांगली.
यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.